दैनिक लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर
(वर्ष ६५ वे अंक १६८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.०१ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## एचएसआरपी नंबर प्लेट नसल्यास आजपासून थेट कारवाई; परिवहन मंत्र्यांचा इशारा

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना हाय-सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवण्याची अंतिम मुदत आज (३० जून) संपत आहे. ''आम्ही आतापर्यंत पाच वेळा मुदतवाढ दिली आहे, त्यामुळे आता पुन्हा मुदतवाढ मिळणार नाही. उद्यापासून (१ जुलै) विना एचएसआरपी नंबर प्लेट धावणाऱ्या वाहनांवर परिवहन विभागाकडून ठोस आणि कडक कारवाई केली जाईल,'' अशी स्पष्ट घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज केली आहे.

या नंबर प्लेटसचे महत्त्व अधोरेखित करताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, ''ज्या पद्धतीने राज्यात आणि देशात देशविरोधी कारवाया घडतात, ते पाहता सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने एचएसआरपी नंबर प्लेट्स अत्यंत आवश्यक आहेत. मुंबईसह अनेक राज्यांमध्ये देशविरोधी घटकांनी केलेल्या हल्ल्यांनंतरच प्रत्येक वाहनावर ही हाय-सिक्युरिटी नंबर प्लेट बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यामुळे संशयास्पद वाहनांची ओळख पटवणे आणि राज्याची सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे सोपे होते.''

वाहनधारकांनी केवळ अधिकृत संकेतस्थळावरूनच एचएसआरपीसाठी नोंदणी करावी आणि कोणत्याही अनधिकृत व्यक्ती अथवा एजंटच्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहनही परिवहन मंत्र्यांनी केले आहे. राज्यातील सर्व वाहनधारकांनी वाहन सुरक्षेच्या दृष्टीने ही प्रक्रिया गांभीर्याने घेत शासनाला सहकार्य करावे, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

# सचिन अहिर यांचा शिंदेंच्या शिवसेनेकडून उपसभापती पदासाठी अर्ज दाखल



मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- विधान परिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीआधी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा धक्कातंत्र वापरलं आहे. उपसभापती पदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाकडून ठाकरेंचे आमदार सचिन अहिर यांनी अर्ज भरला आहे. शिवसेना शिंदे गटाकडून सचिन अहिर यांनी विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केल्याने सगळ्यांनाच धक्का बसला आहे. सचिन अहिर शिवसेना ठाकरे गटाचे विधान परिषदेचे आमदार आहेत. विधान परिषदेतील उपसभापतीपदासाठी सचिन अहिर अर्ज भरताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह माजी उपसभापती नीलम गोऱ्हे, मंत्री चंद्रकांत पाटील देखील उपस्थित होते.

राज्यात नुकत्याच ऑपरेशन टायगरने खळबळ उडाली होती. ठाकरे गटाच्या सहा खासदारांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर ठाकरे गटातील अनेक आमदार देखील शिंदे गटात येतील, असा दावा करण्यात येत होता. त्यातच आज ठाकरेंचं विधान परिषदमधील आमदार सचिन अहिर यांनी शिंदे गटाकडून उपसभापतीपदासाठी अर्ज भरल्याने ठाकरेंना पुन्हा एकदा धक्का बसला आहे. सचिन अहिर यांच्या शिंदे शिवसेनेत प्रवेशानंतर उद्धव ठाकरेंसह आदित्य ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. वरळी मतदारसंघात ठाकरेंच्या शिवसेनेचे दोन विधान परिषदेचे आमदार होते. त्यातील सचिन अहिर होते.

मागील काही दिवसांपासून सचिन अहिर यांना शिंदे शिवसेनेकडून प्रवेशाची ऑफर देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. खासदार संजय दिना पाटील यांच्या प्रवेशानंतर सचिन अहिर हे पक्षप्रवेश करण्यासाठी तयार झाल्याची माहिती आहे. विधान परिषदेच्या उपसभापती पदाची निवडणूक पाहता शिंदे शिवसेनेकडून त्यांना उपसभापती पदाची संधी देण्यात येईल, असा आश्वासन देण्यात आलं. त्यानंतर तातडीने शिंदे शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय सचिन अहिर यांनी घेतल्याची माहिती आहे. वरळी मतदारसंघात सचिन अहिर यांची वेगळी ताकद आहे. पक्ष संघटनेसाठी त्यांनी वरळी मतदारसंघात काम केला आहे शिवाय कामगार संघटनांच्या एकजुटीमध्ये सुद्धा त्यांचा सहभाग आहे. त्यामुळे सचिन अहिर यांच्या जाण्याने ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का वरळी मतदारसंघाचा विचार केला तर पाहायला मिळतोय.

दरम्यान जवळचे आणि ज्यांना सगळं काही मिळतं तेच निघून जातात. कुणाच्या जाण्याने धक्का बसत नाही. वरळी, शिवडी हा आमचा बालेकिल्ला आहे.आमचं तिकडचं काम बोलेल. तुम्हाला अजून काय हवंय, आणखी काय ओरबाडाणार?, सगळ्या परिवाराला काही ना काही दिलंय, अशी प्रतिक्रिया आदित्य ठाकरेंनी दिली. तसेच वरळीतून ते (सचिन अहिर) उमेदवार असतील तर काही फरक पडणार नाही, असंही आदित्य ठाकरेंनी सांगितलं. सचिन अहिरांना हाच प्रश्न आहे की, जे सोडून गेले, जे मंदिरं लुटतायत त्यांच्यासोबत तुम्ही कसे जाऊ शकता? आम्हाला खोलवर अभ्यास केल्यावर हे लक्षात आलंय की, हे ऑपरेशन टायगर नाही तर ऑपरेशन देवेंद्र फडणवीस आहे, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

## मी जे करतो ते फुल प्रूफ करतो!; सचिन अहिरांच्या पक्षप्रवेशावर एकनाथ शिंदेंची फटकेबाजी

शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक मोठा धक्का बसला असून सचिन अहिर यांनी ठाकरे गटाला रामराम करत थेट शिंदे सेनेकडून उपसभापती पदाचा अर्जही भरला आहे. त्यामुळे हा उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे यांनाही मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे राज्यात ऑपरेशन टायगर सुरूच असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे.

ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी विधान परिषद उपसभापतीपदासाठी महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या घडामोडीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत सचिन अहिर यांचे पक्षात स्वागत केले आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. ''आम्ही कोणतेही तोडकाम करत नाही, जोडकाम करतो,'' असे सांगत शिंदे यांनी शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या नेत्यांमागे विकासाचा अजेंडा असल्याचा दावा केला.

पत्रकार परिषदेत बोलताना शिंदे म्हणाले, ''नुकतेच सहा खासदारांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आज सचिन अहिर यांनीही आमच्यासोबत येण्याचा निर्णय घेतला आहे. काही लोक सहा मतदारसंघांमध्ये जाऊन आले आणि त्यांचे सचिन अहिर यांनी षटकार मारून स्वागत केले आहे. खरं तर चौकार-षटकार सुरूच राहतील आणि समोरच्यांच्या विकेट्स पडतच राहतील.''

सचिन अहिर यांच्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करत शिंदे म्हणाले की, ''सचिन अहिर हे माजी राज्यमंत्री आहेत. गिरणी कामगारांचे नेते म्हणून त्यांनी मोठे काम केले आहे. विविध कामगार संघटनांमध्ये त्यांनी नेतृत्व केले. मुंबईतील भूमिपुत्र, कोळीवाडे आणि स्थानिकांच्या प्रश्नांची त्यांना सखोल जाण आहे. ते ग्रासरूट स्तरावर काम करणारे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्या आगमनाने शिवसेनेची ताकद आणखी वाढणार आहे.''

एकनाथ शिंदे म्हणाले, सचिन अहिर यांनी आज विधानसभा उपसभापती पदाचा फॉर्म भरला आहे, महायुतीचा फॉर्म भरला आहे. महायुती आज बहुमतात आहेत. त्यामुळे ते उपसभापती म्हणून उद्या (पान ४ वर)

## अवैध डान्स बार रोखण्यासाठी पोलीस कायद्यात दुरुस्ती करणार-मुख्यमंत्री

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- राज्यात डान्स बारवर नियंत्रण ठेवण्यासाठी करण्यात आलेल्या विद्यमान कायद्यातील पळवाटा बंद करण्यासाठी राज्य सरकार महाराष्ट्र पोलीस अधिनियमात दुरुस्ती करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. या दुरुस्तीनंतर डान्स बार चालविण्यासाठी महाराष्ट्र डान्स बार कायद्यांतर्गतच परवाना घेणे बंधनकारक राहील. पोलीस कायद्यांतर्गत केवळ सादरीकरण (परफॉर्मिंग लायसन्स) घेऊन डान्स बार चालविण्याची प्रथा यामुळे बंद होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

ठाणे जिल्ह्यात ऑर्केस्ट्रा बार उशिरापर्यंत सुरू राहत असल्याबाबत सदस्य नानाभाऊ पटोले यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात डान्स बारवर अनेक निर्बंध असतानाही काही आस्थापनांकडून पोलीस कायद्यांतर्गत परफॉर्मिंग लायसन्स घेऊन प्रत्यक्षात डान्स बार चालविले जात आहेत. (पान ४ वर)

## बालकांचा गुन्ह्यांसाठी वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- बाल गुन्हेगारांसाठीची वयोमर्यादा १८ वर्षांवरून १६ वर्षे करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. बालकांचा गुन्हेगारी आणि अमली पदार्थांच्या वितरणासाठी वापर करणाऱ्यांविरोधात अधिक कठोर कारवाई करता यावी, यासाठी कायद्यात आवश्यक बदल करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. जालना जिल्ह्यात अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीकडे वाढता कल याबाबत सदस्य अर्जुन खोतकर यांनी विधासभेत प्रश्न उपस्थित केला होता. सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनीही उपप्रश्न विचारत या प्रश्नाच्या चर्चेत सहभाग घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लातूर येथे घडलेली घटना वैयक्तिक स्वरूपाची असून ती कौटुंबिक वादातून घडली आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून, तपासात सहभाग निष्पन्न झालेल्या विधिसंघर्षित बालकांना बाल न्याय मंडळासमोर हजर करण्यात आले आहे. मात्र, विधिसंघर्षित बालकांना अटक न करता

बालगृहात ठेवण्याच्या तरतुदीचा गैरफायदा काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक घेत आहेत. अशा प्रवृत्तीचे लोक बालकांकडून गुन्हे घडवून आणण्यासाठी त्यांचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, १६ वर्षांखालील बालकांकडूनही गंभीर गुन्हे होत असल्याचे निदर्शनात आले आहे.

या पार्श्वभूमीवर बालगुन्हेगारीच्या वाढत्या प्रवृत्तीचे वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्यात येणार आहे. तसेच बालकांचा वापर करणाऱ्या टोळ्या आणि संघटित गुन्हेगारीत सहभागी असलेल्या व्यक्तींवर संघटित गुन्हेगारीविषयक कठोर कलमे लावण्याबाबत आणि संबंधित कायदे अधिक प्रभावी करण्याबाबतही विचार करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या संदर्भातील एका उपप्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले की, बालगुन्हेगारी रोखण्यासाठी राज्यात विविध प्रतिबंधात्मक आणि पुनर्वसनात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. पोलीसांकडून शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी जनजागृती, समुपदेशन, सायबर सुरक्षा तसेच व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन केले जाते. संवेदनशील भागांमध्ये नियमित गस्त आणि प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते.

## केतन अग्रवाल प्रकरणात सियाच्या भावाची सखोल चौकशी होणार

पुणे दि.३० (प्रतिनिधी)- राज्यभरात चर्चेत असलेल्या केतन अग्रवाल हत्या प्रकरणात मुख्य संशयित सिया गोयल आणि चेतन चौधरी यांना काल (२९ जून) पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. दोघांची पोलीस कोठडी संपल्यानंतर पोलिसांनी आणखी सात दिवस कोठडी वाढवण्याची मागणी केली होती. दोन्ही बाजूंकडून जोरदार युक्तिवाद झाल्यानंतर न्यायालयाने सिया गोयल आणि चेतन चौधरीला ३ जुलैपर्यंत पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

केतन अग्रवाल हत्या प्रकरणात आता सियाचा भाऊ साहिल गोयलभोवती आता पुढचा तपास फिरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. क्रिकेट खेळताना आधी चेतन आणि साहिलची मैत्री झाली. ही कबुली साहिलने स्वतः दिलीये. पुढं साहिलसोबत सिया मॅच बघायला गेली अन तिथून चेतन तिचा मित्र बनला. पुढं या मैत्रीचं प्रेमात रूपांतर झालं. त्यामुळं सिया-चेतनच्या लव्ह स्टोरीबाबत साहिलला (पान ४ वर)

## खासगी शिकवणी वर्ग आणि पूर्व प्राथमिक शाळांसाठी विशेष कायदा येणार; शिक्षणमंत्री दादा भुसे यांची विधान परिषदेत घोषणा

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- राज्यातील पूर्व प्राथमिक वर्ग आणि शिकवणी वर्ग यांच्यासाठी प्रारूप अधिनयम तयार केले जात असल्याची माहिती शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिली. राज्यातील शिक्षण व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्यासाठी सरकार अनेक महत्त्वाचे निर्णय घेत असून पूर्वप्राथमिक शिक्षण, खासगी शिकवणी वर्गांचे नियमन, शाळांमधील मूलभूत सुविधा, शिक्षक प्रशिक्षण आणि अभ्यासक्रमात बदल यावर भर दिला जात असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिली.

तीन ते सहा वर्षे वयोगटातील मुलांना पूर्वप्राथमिक शिक्षण देणाऱ्या सर्व खासगी केंद्रांची नोंदणी शालेय शिक्षण विभागाच्या पोर्टलवर बंधनकारक करण्यात आली आहे. २४ एप्रिल २०२५ च्या शासन परिपत्रकानुसार आतापर्यंत सुमारे १३ हजार केंद्रांची नोंदणी झाली आहे. बालकांना सुरक्षित, खेळावर आधारित आणि बालकेंद्रित शिक्षण मिळावे यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्याचे काम सुरू आहे.

खासगी शिकवणी वर्गांसाठीही केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचा आणि इतर राज्यांतील कायद्यांचा अभ्यास करून महाराष्ट्रासाठी स्वतंत्र कायदा आणला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निरीक्षण समित्या कार्यरत आहेत. राज्यातील प्रत्येक शाळेत स्वच्छतागृह, शुद्ध पिण्याचे पाणी आणि सुरक्षित इमारती उपलब्ध करून देण्यावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमात बदल सुरू आहे. दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीचे नवे पाठ्यपुस्तक यंदापासून लागू करण्यात आले आहेत. पुढील टप्प्यात दहावी व बारावीपर्यंतचा अभ्यासक्रमही अद्ययावत केला जाईल.

## फडणवीस त्यांच्या पदावर राहणार की नाही? एकनाथ शिंदेंनी रहस्यमय वातावरण तयार केले-संजय राऊत

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा ऑपरेशन टायगर मुळे मोठी खळबळ उडाली आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या ६ खासदारांनी बंडखोरी करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. या मोठ्या राजकीय घडामोडीनंतर आता केंद्रात शिंदे गटाला दोन मंत्रिपदे मिळण्याची चर्चा रंगली आहे. याच पार्श्वभूमीवर, सोमवारी रात्री उशिरा तानाजी सावंत आणि धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महत्त्वाची भेट घेतली, ज्यामुळे राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे. आता या सर्व घडामोडींवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी खळबळजनक दावा केला.

संजय राऊत माध्यमांशी बोलताना म्हणाले की: ''ओम निंबाळकर सोंगाड्या आहे. मला देवेंद्र फडणवीस यांचं आश्चर्य वाटतं की, विरोधी पक्षात असताना त्यांना तुम्ही भेटी देत नाहीत. त्यांनी आणलेल्या विकासकामांच्या कागदांवर तुम्ही चर्चा करत नाहीत. पण एखाद्याने पक्षांतर केले की (पान ४ वर)

## जळगावमध्ये महिलेवर सामूहिक अत्याचार; १४ जणांना अटक

### दोघांकडून अत्याचार, तिसऱ्याने व्हिडीओ शूटकेल्याचा आरोप

जळगाव दि.३० (प्रतिनिधी)- जळगाव जिल्ह्यातील फत्तेपूर पोलीस ठाणे हद्दीत सामूहिक अत्याचार झाल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी १५ पैकी १४ सह आरोपींना अटक केली आहे. २ जून रोजी देऊळगाव-कापूसवाडी रस्त्यावरील ठांबरडा नाल्याजवळील निर्जन जंगल परिसरात ४० वर्षीय महिला तिच्या मित्रासोबत बसली असताना, तिच्या मित्रासमोरच दोन आरोपींनी जबरदस्तीने सामूहिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या घटनेदरम्यान इतर आरोपींनी संपूर्ण प्रकाराचे मोबाईलवर चित्रीकरण केले होते. त्यापैकी एका संशयिताने हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्यानंतर प्रकरण पुन्हा चर्चेत आले. घटनेची माहिती मिळताच फत्तेपूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला वेग दिला.

जळगाव जिल्ह्यातील फत्तेपूर पोलीस ठाणे हद्दीत सामूहिक अत्याचार झाल्याचा खळबळजनक प्रकार काल पीडितेने पोलिसांमध्ये तक्रार दिल्याच्यानंतर समोर आला होता. या घटना प्रकरणात पोलिसांनी १५ पैकी १४ आरोपींना अटक केली आहे. तर एक जण फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहे. अटक केलेल्या आरोपींना आज जामनेर न्यायालयात हजर केले जाणार आहे. देऊळगाव-कापूसवाडी रस्त्यावरील ठांबरडा नाल्याजवळील निर्जन जंगल परिसरात २ जून रोजी ४० वर्षीय विवाहित महिला तिच्या मित्रासह फिरायला गेली होती,यावेळी लाकूड तोडीसाठी जंगलात फिरत असलेल्या तरुणांना पीडित महिला (पान ४ वर)

## शेतकरी कर्जमाफी म्हणजे निव्वळ बनवाबनवी, विजय वडेट्टीवारांचा सरकारवर घणाघात

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- राज्यातील शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली कर्जमाफी ही निव्वळ बनवाबनवी आणि फसवी असल्याचा घणाघाती आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. मंगळवारी (३० जून) विधानभवनात माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीवरून आणि मग्रुरीवरून राज्य सरकारवर सडकून टीका केली. तसेच, याआधी काल (२९ जून) विधानसभेत बोलतानाही त्यांनी ३६ हजार कोटींच्या कर्जमाफीच्या दाव्यातील फोलपणा आणि जाचक अटींवरून सरकारला अक्षरशः धारेवर धरले होते.

आज (३० जून) पत्रकारांशी बोलताना विजय वडेट्टीवार यांनी सरकारला घेरले. प्रशासकीय अधिकारी वारंवार गैरहजर राहत असल्याच्या मुद्द्यावर वडेट्टीवार संतापले. ते म्हणाले, ''मुख्यमंत्र्यांनी वारंवार सांगूनही प्रशासन निर्ढावल्यासारखे वागत आहे. याचा अर्थ सरकारचा धाक आता प्रशासनावर राहिलेला नाही. या अधिकाऱ्यांची मग्रुरी आणि मस्ती वाढली आहे. केवळ कारणे दाखवा नोटीस देऊन काहीही होणार नाही. जर खरंच धाक निर्माण करायचा असेल, तर या लोकांची किमान दोन इन्क्रिमेंट (वेतनवाढ) रोखली पाहिजेत. तरच ही शिक्षा दिसेल आणि पुन्हा कोणी असे धाडस करणार नाही.''

कर्जमाफीच्या आकड्यांवरून सरकारला उघडे पाडताना ते म्हणाले, ''सरकारने साडेछत्तीस हजार कोटींची कर्जमाफी जाहीर केली, पण पुरवणी मागण्यांमध्ये फक्त २० हजार कोटींची तरतूद आहे. मग उरलेले साडेसोळा हजार कोटी कुठून आणणार? तुम्ही हा गॅप कसा भरून काढणार? याचा अर्थ ही पूर्णपणे बनवाबनवी आहे. हे आकडे फुगवून सांगितले आहेत. (पान ४ वर)

## चेंबूरमध्ये स्कूल व्हॅनवर झाड कोसळून एका विद्यार्थ्याचा मृत्यू, चार विद्यार्थी जखमी

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- चेंबूरच्या डायमंड उद्यान परिसरात मंगळवारी दुपारी एका स्कुल व्हॅनवर एक भले मोठे झाड कोसळले. या दुर्घटनेत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. तर यामध्ये चार विद्यार्थी जखमी झाले असून त्यांच्यावर परिसरातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मंगळवारी दुपारी सव्वा तीनच्या सुमारास ही घटना चेंबूरच्या सेंट अँथनी हायस्कुल परिसरातील ११ वा रस्ता येथे घडली. टिळक नगर परिसरात असलेल्या युनिव्हर्सल विद्यालयाचे विद्यार्थी घेऊन ही व्हॅन परिसरात मुलांना घरी सोडण्यासाठी आली होती.

## बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचे क्षेत्र, ३ ते ७ जुलै दरम्यान महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- राज्यातील बहुतांश भागात पावसाला सुरुवात झाली आहे. का भागात पेरणीच्या कामांना देखील वेग आल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तर काही भागात आणखी चांगल्या पावसाची गरज आहे. अशातच हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस डी सानप यांनी पावसासंदर्भातील अंदाज वर्तवला आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ ते ७ जुलै दरम्यान महाराष्ट्रात सर्वदुर पावसाची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. त्यामुळं पाऊस परतण्याची शक्यता आहे.

३ ते ७ जुलै दरम्यान महाराष्ट्रातील सागरी किनारपट्टीवर मुसळधार पाऊस पडेलच त्याचबरोबर विदर्भ आणि मराठवाड्यात देखील ऑरेंज अलर्ट असेल असी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस डी सानप यांनी दिली आहे. यावर्षी एल निनोमुळे पाऊस कमी आहे. हे आधीच सांगितले आहे. मॉन्सुनचे वारे कमकुवत आहेत. एल निनोचा परिणाम पुढील वर्षी देखील जाणवणार असला तरी पुढील वर्षीच्या पावसाचा अंदाज आता सांगता येणार नाह अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस डी सानप यांनी दिली.

रायगड जिल्ह्याला पुढील पाच दिवस पावसाचा ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे. तसेच रायगडच्या दक्षिण भागात पावसाने हजेरी लावत शेतकऱ्याला दिलासा दिला आहे. रायगड मध्ये २३ जूनला सुरू झालेल्या पावसाने दोन दिवस दडी मारली होती. मात्र, कालपासून पुन्हा पाऊस बरसू लागल्याने शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळाला आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास पुढील दिवसात शेतीची लावणी सुरू होण्याची शक्यता आहे. रायगड मधील अनेक नद्यांच्या पाणीपातळी मध्ये देखील हळूहळू वाढ होत असून पाण्याची चिंता मिटली आहे.

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. मुसळधार पावसामुळे हयातनगर, लिंगी, पळशीसह परिसरातील शिवार जलमय झाले असून अनेक शेतांमध्ये पाणी साचले आहे. जोरदार पावसामुळे लहान-मोठे ओढेही दुथडी भरून वाहू लागले आहेत. पेरणीसाठी आवश्यक असलेला हा पहिला समाधानकारक पाऊस असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

वसमत तालुक्यातील हयातनगर, लिंगी आणि पळशी परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावली. अवघ्या काही वेळात शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले, तर अनेक ओढे प्रवाहित झाल्याने परिसरातील निसर्गही बहरून गेला. गेल्या महिनाभरापासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस दिलासादायक ठरला आहे. आता पेरणीच्या कामांना वेग येणार असल्याने बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य दिसून येत आहे.

# झाडे लावा, झाडे वाचवा

**मनुष्याला** आपले जीवन जगण्यासाठी मूलभूत गरजा दिल्या आहेत. त्यामुळे जे काय मनुष्याचे अस्तित्व आहे ते झाडांमुळेच. तेव्हा मनुष्याला ज्या प्रमुख जीवनावश्यक वस्तू मिळतात त्या झाडांमुळे. त्यामुळे झाडे लावा, झाडे जगवा असे म्हणत असतो. अशी मोहीम शासकीय स्तरावर सुद्धा करण्यात आली आणि आजही ती चालू आहे. आता मात्र परिस्थिती वेगळी आहे. दिवसेंदिवस झाडांचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे आता झाडे लावा, झाडे वाचवा अशी म्हणण्याची वेळ आपल्यावर आली आहे. तेव्हा हा संशोधनाचा महत्त्वाचा भाग जरी असला तरी प्रत्येकाने पावसाळ्यात किमान एक तरी झाड लावले पाहिजे. जी झाडे तोडली जातील त्यांना विरोध केला पाहिजे. एक झाड तोडल्यास किमान दोन झाडे लावली पाहिजेत. तरच झाडे वाचतील आणि पर्यावरणपूरक वातावरण राहील.

पृथ्वीवर आज जे काही मानवाचे अस्तित्व आहे त्याचे एकमेव कारण म्हणजे वृक्ष. त्यासाठी नागरिकांना झाडांचे महत्त्व समजून सांगितले पाहिजे. आज राज्यातील प्रत्येक गावामध्ये 'झाडे लावा, झाडे वाचवा' हा उपक्रम राबविला गेला पाहिजे. तसेच या उपक्रमाबरोबर आज पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी 'एक व्यक्ती एक झाड' लावले पाहिजे. हा उपक्रम प्रत्येक घराघरात राबवायला हवा. तरच वाढत्या तापमानाला आळा बसेल. त्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे. तरच नागरिक झाडे लावण्यास व त्यांचे संगोपन करण्यास प्रोत्साहित होतील. तेव्हा झाडे लावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे. झाडांचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले पाहिजे. आपण झाडांशिवाय जगू शकत नाही. हे नागरिकांना पटवून सांगितले पाहिजे. गावात झाडे वाचविण्यासाठी जनजागृती रॅली काढली पाहिजे. गावामध्ये मोक्याच्या ठिकाणी झाडांचे महत्त्व सांगणारे फलक लावले पाहिजेत. गावातील नागरिकांना जागृत करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून व्याख्याने आयोजित करावीत. गाव पातळीवर प्रत्येक घरानुसार झाडांचे वाटप करावे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडांची लागवड करावी. मात्र याचे आजच्या नवीन पिढीला काहीही देणे-घेणे नाही असेच दिसते. घरात कृत्रिम थंडगार हवा असली म्हणजे झाले. त्यासाठी आई-वडील काय करतात त्याचे त्यांना काहीच देणे नसते. झाडे लावण्यापेक्षा घरात मनीप्लँट लावणे मुले पसंत करतात. म्हणे यामुळे घरात पैसा येतो, इतका अडाणीपणा. तेव्हा सर्वांनी झाडांचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. पुढील वर्षी असे न म्हणता, या वर्षापासून मी झाडे लावून त्यांचे मी संगोपन करेन असे ध्येय प्रत्येकांनी ठेवले पाहिजे. कारण आपल्याला झाडे प्राणवायू देत असतात याची जाणीव असायला हवी. एकवेळ घनदाट दिसणारी हिरवीगार जंगले आता ओसाड दिसत आहेत. ज्याठिकाणी सुपीक जमीन होती त्या जमिनीतून शेतकरी राजा सोन्याचे गोठे पिकवत होता. आता त्याठिकाणी सिमेंटच्या गगनचुंबी इमारती दिसत आहेत. याचे कारण मानवाच्या गरजांमुळे झाडांची कत्तल होताना दिसत आहे. त्यामुळे जास्त उकाडा आणि पावसाचे कमी होत जाणारे प्रमाण याला आपणच जबाबदार आहेत. झाडांमुळे आपल्याला पुरेशी शुद्ध हवा, पिण्यासाठी पाणी व हवामान नियंत्रित करण्यात मदत होते. कारण झाडे ही नैसर्गिक संसाधने मानवाला पुरवीत असतात. आतापर्यंत आपण झाडे लावा, झाडे जगवा असे पावसाळा सुरू झाल्यावर म्हणत होतो. आता तसे म्हणून चालणार नाही. तसेच झाडांना खड्डे खोदून चालणार नाही.

अलीकडे खोदलेले खड्डे सुद्धा चोरीला जातात. तेव्हा अगोदर झाडांची रोपे घेऊन येऊन जसे खड्डे खोदले जातील त्याप्रमाणे रोपे सुद्धा लावली पाहिजे. झाडांच्या सुरक्षिततेसाठी कुंपण सुद्धा घातले पाहिजे. झाडे लहान असताना त्याची देखभाल करावी. तसेच झाडे मोठी झाल्यावर ती तोडणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी.

आपण सर्वजण दरवर्षी ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करीत असलो तरी जागतिक तापमानात वाढ होत आहे, याचा विचार होणे आवश्यक आहे. तसेच या दिवशी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी पर्यावरणविषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. हा दिवस आपल्या देशात 'जंगले निसर्ग तुमच्या सेवेत' आणि 'प्लास्टिक प्रदूषणावर मात करा' या थीमसह आयोजित केला आहे. जागतिक पर्यावरण दिनाची आपल्या देशातील थीम लक्षात घेऊन देशातील तापमानाचा विचार करता पुढील वर्षी 'झाडे लावा, झाडे वाचवा'अशी थीम भारत सरकारने जाहीर करावी. त्या अगोदर देशातील प्रत्येक नागरिकांनी झाडे लावा, झाडे वाचवा वचन बद्ध होऊ या.

## लाच स्वीकारताना वैजापूर येथे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता एसीबीच्या जाळ्यात

वैजापूर दि.३० (प्रतिनिधी)- वैजापूर पंचायत समिती पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. प्रभारी गटविकास अधिकारी, प्रशासकीय कारभारावरील प्रश्न, बैठकींतील गोंधळ आणि कामांमध्ये टक्केवारीच्या चर्चांमुळे आधीच टीकेचे धनी ठरलेल्या पंचायत समितीवर आता भ्रष्टाचाराचा आणखी एक डाग लागला आहे. सोमवारी (२९ जून) पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थीला दुसरा हप्ता मिळवून देण्यासाठी जिओ-टॅगिंग व फोटो अपलोड करण्याच्या कामाच्या मोबदल्यात अवघ्या १ हजारांची लाच स्वीकारताना ग्रामीण गृहनिर्माण अभियंता प्रवीण गायकवाड (रा. पानवी) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले.

तक्रारदाराने लाच देण्यास नकार देत एसीबीकडे तक्रार केली होती. पडताळणीत लाच मागणी स्पष्ट झाल्यानंतर सोमवारी सापळा रचण्यात आला. लाचेची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीकडून लाचेची रक्कम, इतर रोख रक्कम आणि दोन मोबाइल जप्त केले. पोलिस निरीक्षक शांतीलाल चव्हाण यांनी कारवाईचे नेतृत्व केले, तर पोलिस निरीक्षक प्रतिभा अबूज तपास अधिकारी आहेत.

# कृषी : महाराष्ट्राच्या समृद्धीचा पाया

**द**रवर्षी १ जुलै हा दिवस महाराष्ट्रात 'कृषी दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका स्मृतिदिनापुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीचा, शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांचा आणि शेतीच्या सर्वांगीण विकासाचा गौरव करणारा दिवस आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. महाराष्ट्राच्या कृषी विकासात त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे शेतीच्या आधुनिकीकरणाला चालना मिळाली, सिंचनाचा विस्तार झाला, कृषी संशोधनाला प्रोत्साहन मिळाले आणि शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण धोरणे राबविण्यात आली. त्यामुळे कृषी दिन हा केवळ एका नेत्याला अभिवादन करण्याचा दिवस नसून शेती आणि शेतकरी यांच्या सन्मानाचा, त्यांच्या योगदानाची जाणीव करून देणारा आणि कृषी क्षेत्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी नव्या संकल्पांचा दिवस आहे.

भारतीय संस्कृतीचा पाया कृषीवर उभा आहे. हजारो वर्षांपासून शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून जीवनपद्धती, संस्कृती आणि अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू राहिली आहे. महाराष्ट्राची ओळखही समृद्ध कृषी परंपरेमुळे निर्माण झाली आहे. विदर्भातील कापूस, मराठवाड्यातील ज्वारी, पश्चिम महाराष्ट्रातील ऊस, कोकणातील आंबा, नाशिकचा द्राक्षबागायती पट्टा, उत्तर महाराष्ट्रातील कांदा, खानदेशातील केळी, सातारा-सांगलीतील हळद आणि विविध भागांतील डाळी, तेल बिया, फळे व भाजीपाला यामुळे महाराष्ट्राने कृषी क्षेत्रात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. राज्यातील भौगोलिक विविधता आणि हवामानातील बदलांमुळे विविध प्रकारची पिके घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात वैविध्य निर्माण झाले असून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया शेतीने घातला आहे.

शेतकरी हा समाजाचा अन्नदाता आहे. तो उन्हाची तमा न बाळगता, पावसाची अनिश्चितता सहन करत, अनेक संकटांना सामोरे जात शेती करतो. त्याच्या कष्टामुळे प्रत्येक घरात अन्न पोहोचते. शेती हा केवळ व्यवसाय नसून निसर्गाशी असलेला जिव्हाळ्याचा संवाद आहे. बी पेरण्यापासून ते पीक घरात आणेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्याला संयम, परिश्रम आणि आशावादाची गरज असते. पाऊस वेळेवर पडेल का, रोगराई येईल का, बाजारभाव मिळेल का, उत्पादन खर्च भरून निघेल का, अशा अनेक प्रश्नांशी तो सतत झुंज देत असतो. तरीही तो निराश न होता पुन्हा नव्या हंगामाची तयारी करतो. म्हणूनच कृषी दिन हा शेतकऱ्यांच्या त्यागाचा आणि जिद्दीचा सन्मान करणारा दिवस आहे.

महाराष्ट्राच्या कृषी विकासामध्ये काळानुरूप मोठे बदल झाले आहेत. पारंपरिक शेतीपासून आधुनिक शेतीकडे वाटचाल करताना नवीन बियाणे, सुधारित अवजारे, ठिबक आणि तुषार सिंचन, यांत्रिकीकरण, कृषी संशोधन, हवामान आधारित सल्ला आणि माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला आहे. आज अनेक शेतकरी मोबाईलच्या माध्यमातून हवामानाचा अंदाज, बाजारभाव, पीक संरक्षण आणि कृषीविषयक मार्गदर्शन मिळवत आहेत. कृषी विद्यापीठे, संशोधन संस्था आणि कृषी विज्ञान केंद्रे शेतकऱ्यांपर्यंत नवीन तंत्रज्ञान पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. उत्पादनवाढीसोबत गुणवत्तापूर्ण उत्पादनावर भर दिला जात असून निर्यातक्षम शेतीचा विस्तारही होत आहे.

हवामान बदल हे आज कृषी क्षेत्रासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. पावसाचे अनियमित स्वरूप, वाढते तापमान, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट आणि पूर यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. एका बाजूला पाण्याचा तुटवडा तर दुसऱ्या बाजूला अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान




अशी दुहेरी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शाश्वत कृषी विकासासाठी हवामानाशी सुसंगत शेती पद्धती स्वीकारणे अत्यावश्यक झाले आहे. जल संधारण, सूक्ष्म सिंचन, पावसाच्या पाण्याचे संधारण, पीक विविधीकरण, मृदसंवर्धन आणि कमी पाण्यात येणाऱ्या पिकांचा अवलंब या उपाययोजना भविष्यातील शेतीसाठी अत्यंत आवश्यक ठरणार आहेत.

पाणी हे शेतीचे प्राण आहे. महाराष्ट्रातील अनेक भाग अजूनही पावसावर अवलंबून आहेत. त्यामुळे प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून जल व्यवस्थापनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. जलयुक्त शिवार, शेततळे, बंधारे, नाला खोलीकरण, ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन यांसारख्या उपायांमुळे पाण्याचा कार्यक्षम वापर शक्य झाला आहे. अनेक गावांनी लोकसहभागातून जलसंधारणाची यशस्वी उदाहरणे निर्माण केली आहेत. पाण्याचे योग्य नियोजन केल्यास उत्पादन वाढते, खर्च कमी होतो आणि दुष्काळाच्या संकटावर मात करता येते.

मातीचे आरोग्य जपणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. रासायनिक खतांचा अतिरेक, जमिनीची धूप आणि सेंद्रिय पदार्थांचे कमी होत जाणारे प्रमाण यामुळे जमिनीची सुपीकता घटत आहे. त्यामुळे सेंद्रिय खतांचा वापर, हिरवळीची खते, गांडूळखत, जैवखते आणि संतुलित पोषण व्यवस्थापन यावर भर देणे गरजेचे आहे. मृदा परीक्षण करून आवश्यकतेनुसार खतांचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होण्याबरोबरच खर्चातही बचत होते. माती ही केवळ उत्पादनाचे साधन नसून पुढील पिढ्यांसाठी जपून ठेवण्याची नैसर्गिक संपत्ती आहे.

आजच्या काळात नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती आणि शाश्वत शेती यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्राहकांमध्ये रसायनमुक्त अन्नधान्याची मागणी वाढत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी नैसर्गिक शेतीकडे वळत आहेत. स्थानिक संसाधनांचा वापर, कमी खर्च, पर्यावरणपूरक तंत्रज्ञान आणि जमिनीचे आरोग्य जपण्यावर आधारित शेती भविष्यासाठी अधिक उपयुक्त ठरत आहे. अशा शेतीमुळे उत्पादनाचा दर्जा सुधारतो, पर्यावरणाचे संवर्धन होते आणि ग्राहकांनाही सुरक्षित अन्न उपलब्ध होते.

कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाने मोठी क्रांती घडवून आणली आहे. ड्रोनद्वारे पीक निरीक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित रोगनिदान, उपग्रह तंत्रज्ञान, सेन्सर प्रणाली, स्वयंचलित सिंचन, डिजिटल बाजारपेठ आणि ई-व्यापारामुळे शेती अधिक वैज्ञानिक बनत आहे. अचूक शेतीमुळे पाणी, खते आणि कीटकनाशकांचा योग्य वापर करता येतो. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढते. भविष्यात डिजिटल कृषी ही ग्रामीण विकासाची महत्त्वाची दिशा ठरणार आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केवळ उत्पादन वाढविणे पुरेसे नाही, तर मूल्यवर्धन आणि बाजारपेठेशी थेट जोडणी आवश्यक आहे. कृषी प्रक्रिया उद्योग, शीतगृहे, साठवणूक सुविधा, निर्यात, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि थेट ग्राहकांना विक्री या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळू शकतो. फळे, भाजीपाला, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशी पालन, रेशीम उद्योग आणि कृषी पर्यटन यांसारखे पूरक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यास मदत करतात. शेतीला उद्योगाची जोड मिळाल्यास रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाढ दोन्ही शक्य होतात.

महिलांचे कृषी क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. पेरणी, निंदणी, कापणी, पशुपालन, बीज संवर्धन आणि कृषी प्रक्रिया यामध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. अनेक महिला बचतगट कृषीपूरक उद्योग यशस्वीपणे चालवत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य, बाजारपेठ आणि आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता वाढविणे आवश्यक आहे. महिला सशक्त झाल्यास कृषी विकासालाही नवी गती मिळते.

युवा पिढीने शेतीकडे आधुनिक व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज आहे. कृषी पदवीधर, कृषी उद्योजक आणि स्टार्टअपच्या माध्यमातून अनेक तरुण शेतीत नवकल्पना आणत आहेत. स्मार्ट शेती, कृषी सल्लागार सेवा, ॲग्री-टेक, जैवउत्पादने, प्रक्रिया उद्योग आणि ई-कॉमर्सच्या माध्यमातून शेतीला नवे आयाम मिळत आहेत. शिक्षित तरुणांनी ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करून कृषी क्षेत्र अधिक स्पर्धात्मक आणि सक्षम बनविण्याची आवश्यकता आहे.

कृषी शिक्षण आणि संशोधन हे कृषी विकासाचे आधारस्तंभ आहेत. बदलत्या हवामानानुसार नवीन वाण विकसित करणे, रोगप्रतिबंधक तंत्रज्ञान, कमी खर्चातील शेती, जैवविविधतेचे संवर्धन आणि आधुनिक कृषी व्यवस्थापन यासाठी संशोधन संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. संशोधनातून विकसित होणारे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचले तर कृषी क्षेत्र अधिक सक्षम होईल.

आज कृषी क्षेत्रासमोर अनेक समस्या आहेत. उत्पादन खर्च वाढत आहे, बाजारभावात चढ-उतार होत आहेत, नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे, शेतीचे क्षेत्र लहान होत आहे आणि ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढत आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी दीर्घकालीन कृषी धोरण, शाश्वत जल व्यवस्थापन, पिकांचे योग्य नियोजन, विमा संरक्षण, कृषी प्रक्रिया उद्योग आणि शेतकरी-केंद्रित धोरणे आवश्यक आहेत. शासन, संशोधन संस्था, स्वयंसेवी संघटना आणि शेतकरी यांनी समन्वयाने कार्य केल्यास कृषी क्षेत्र अधिक सक्षम होऊ शकते.

'जय जवान, जय किसान' हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. देशाची अन्नसुरक्षा, अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य यांचा पाया शेतीवरच अवलंबून आहे. कृषी हा केवळ अर्थकारणाचा विषय नसून पर्यावरण, संस्कृती, रोजगार, पोषण आणि ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाचा योग्य सन्मान, त्यांच्या उत्पादनाला न्याय्य मोबदला आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास भारत जगातील अग्रगण्य कृषी राष्ट्र म्हणून अधिक सक्षमपणे उभा राहू शकतो.

कृषी दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रमांचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा आणि नव्या संकल्पांचा दिवस आहे. शेतकरी समृद्ध झाला तर गाव समृद्ध होईल, गाव समृद्ध झाले तर राज्य प्रगत होईल आणि राज्य प्रगत झाले तर देशाची प्रगती अधिक वेगाने होईल. म्हणूनच कृषी दिनाच्या निमित्ताने जल, जमीन, जंगल आणि जैवविविधतेचे संवर्धन करत आधुनिक विज्ञान आणि पारंपरिक ज्ञान यांचा समन्वय साधणारी शाश्वत शेती उभारण्याचा निर्धार करणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या घामाच्या प्रत्येक थेंबाचा सन्मान, कृषी क्षेत्रातील नवसंशोधनाचा स्वीकार आणि निसर्गाशी सुसंगत विकासाचा मार्ग स्वीकारणे, हीच महाराष्ट्राच्या कृषी दिनाची खरी प्रेरणा ठरेल. कृषी हा केवळ व्यवसाय नाही, तर संस्कृती, सभ्यता आणि जीवनाचा आधार आहे. त्यामुळे 'समृद्ध शेतकरी, समृद्ध महाराष्ट्र आणि समृद्ध भारत' हे स्वप्न साकार करण्यासाठी कृषी दिन हा प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणा, कृतज्ञता आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक

***

# कृषी विकासाचा पाया घालणारे दूरदृष्टीचे नेतृत्व: वसंतराव नाईक

**म**हाराष्ट्राच्या कृषी इतिहासात स्वर्गीय वसंतराव नाईक यांचे योगदान अमूल्य असून त्यांचे नाव हरितक्रांतीच्या शिल्पकारांमध्ये सन्मानाने घेतले जाते. त्यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली या खेड्यात बंजारा समाजातील एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे स्वप्न होते की, त्यांचा मुलगा शिकून समाजासाठी काहीतरी भरीव काम करेल. वसंतराव नाईक यांनी हे स्वप्न केवळ पूर्णच केले नाही, तर त्यांनी राज्याच्या कृषी, सहकार, सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्राला आधुनिकतेची दिशा दिली. म्हणूनच त्यांचा जन्मदिवस, १ जुलै, 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो.



१९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर त्यांनी महसूलमंत्री म्हणून कारकीर्द सुरू केली आणि पुढे १९६३ ते १९७५ या सलग ११ वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राने अन्नधान्याच्या टंचाईवर मात केली. त्यांनी जेव्हा पदभार स्वीकारला, तेव्हा राज्य तूटग्रस्त होते, परंतु त्यांनी पद सोडताना राज्याला स्वयंपूर्णतेच्या वाटेवर आणले होते. १९७२ च्या भयंकर दुष्काळात लाखो शेतकरी व शेतमजूर उपासमारीच्या संकटात सापडले होते. अशा कठीण प्रसंगी वसंतराव नाईक यांनी 'मागेल त्याला काम' या तत्त्वावर आधारित रोजगार हमी योजना सुरू करून सुमारे ५० लाख लोकांना काम उपलब्ध करून दिले आणि राज्यात एकही भूकबळी पडू दिला नाही.

वसंतराव नाईक यांचा विश्वास होता की, शेतकऱ्यांचा विकास हा संपूर्ण राज्याच्या आणि देशाच्या विकासाचा पाया आहे. त्यांनी सहकार क्षेत्राला बळकटी दिली, त्यामुळे महाराष्ट्रात उसाचे उत्पादन वाढून शंभरहून अधिक साखर कारखाने स्थापन झाले. त्यांनी शेतकऱ्याला केवळ उत्पादक न राहता, उद्योजक व्हावे, त्याला त्याच्या मालाला चांगला भाव मिळावा, त्याच्या मेहनतीला आर्थिक मूल्य मिळावे, असा प्रयत्न केला. त्यामुळे साखर उद्योगातून शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले.

कृषी क्षेत्राला पुरक असलेल्या पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, वन या क्षेत्रांनाही त्यांनी महत्त्व दिले. त्यांना ठाऊक होते की, आधुनिक शेतीसाठी संशोधन आणि तंत्रज्ञान महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांनी महाराष्ट्रात चार स्वतंत्र कृषी विद्यापीठांची स्थापना केली – राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणीतील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि दापोलीतील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ. या विद्यापीठांमधून आजही संशोधनाच्या माध्यमातून नव्या वाणांची, शेती अवजारांची निर्मिती होते आणि शेतकऱ्यांसाठी उपयुक्त शिफारशी दिल्या जातात.

'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा त्यांच्या शेती विकासाच्या धोरणाचा केंद्रबिंदू होता. त्यांनी लहान बंधारे, पाझर तलाव आदी योजनांचा पुरस्कार केला. त्यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्रातील शेतजमिनींवर मृदसंधारणाचे कार्य प्रभावीपणे राबवले गेले. त्यांनी सुरू केलेले बंधारे 'वसंत बंधारे' या नावाने ओळखले जाऊ लागले. जमिनीची धूप रोखण्यासाठी समपातळीवर बांध घालून त्यांनी राज्यातील हजारो एकर जमीन सुपीक बनवली.

महाराष्ट्रातील ८४ टक्के शेती कोरडवाहू असून त्यावर हवामानाचा मोठा परिणाम होतो. वसंतराव नाईक यांनी या बाबी ओळखून जल संधारणावर भर दिला. पाझर तलावांच्या माध्यमातून त्यांनी भूगर्भातील जलसाठा वाढवला आणि विहिरींना मुबलक पाणी उपलब्ध करून दिले. त्यामुळे खरीपासोबतच रब्बी पिकांची लागवड शक्य झाली आणि उत्पादनात मोठी वाढ झाली.

'शेती संपन्न झाली तरच लोकशाही टिकेल', हा त्यांचा ठाम विश्वास होता. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करूनच शेती आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावू शकते, हे त्यांनी दूरदृष्टीने ओळखले. त्यांनी हरितक्रांतीचा संदेश केवळ गावागावातच नव्हे तर शेतकऱ्यांच्या मनामनात रुजवला. शेतकऱ्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन करून समृद्धीकडे नेण्याचे त्यांचे धोरण आजही अत्यंत समर्पक ठरते.

स्व. वसंतराव नाईक यांनी आधुनिक शेतीचे जे बीज रोवले, त्याचा आज संपूर्ण राज्यात आणि देशात सशक्त वृक्ष झालेला दिसतो. त्यांनी घेतलेले निर्णय आणि राबवलेले कार्यक्रम केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नव्हते, तर ते आजही मार्गदर्शक ठरू शकतात. त्यांच्या कार्यकर्तृत्वाकडे आपण केवळ ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहू नये, तर आजच्या प्रश्नांसाठी ते काय मार्गदर्शन करू शकतात, याकडे पाहणे आवश्यक आहे.

आजच्या जागतिक वातावरणीय बदल, जलसंकट आणि आर्थिक अनिश्चिततेच्या काळात वसंतराव नाईक यांच्या विचारांचा पुनर्प्रत्यय घेणे हे काळाची गरज आहे. शाश्वत शेती, विज्ञानाधिष्ठित उत्पादन, जलसंधारण व तंत्रज्ञानाचा समन्वय यावर आधारित शेती धोरणांचा अवलंब केल्यासच शेतकरी आणि ग्रामीण समाजाचा खरा विकास होईल. त्यांचे विचार आणि कार्य आपण पुढच्या पिढीकडे पोहोचवले, तर तीच त्यांच्या स्मृतीस खरी आदरांजली ठरेल.

अशा या दूरदृष्टी असलेल्या, शेतकरी हितैषी, दूरदृष्टीचे व कर्तृत्ववान नेतृत्व करणाऱ्या वसंतराव नाईक यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

**- डॉ. भागवत राजाभाऊ चव्हाण,**
सहायक प्राध्यापक, कृषि वनस्पतीशास्त्र
मो. ८७६७४५६४५५

***

## हरित कृषी क्रांतीचे जनक; स्व.वसंतराव नाईक

**म**हाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून वर्ष १९६३ ते वर्ष १९७४ पर्यंत महाराष्ट्र राज्याची धुरा धुरंधरपणे सांभाळून राज्याच्या विविध क्षेत्रात उन्नती,व विकास करून देशात एक सम्पन्न राज्य म्हणून नाव-लौकीक मिळवून देणारे स्व, वसंतराव नाईक एक कर्तृत्व सम्पन्न मुख्यमंत्री होते. राज्याचे ते तिसरे मुख्यमंत्री होत.त्यानी आपल्या काळात महाराष्ट्र राज्य वैभवशाली राज्य बनविले. त्यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरीमुळे त्यांना हरित क्रांतीचे व कृषी क्रांतीचे जनक म्हणतात.

दरवर्षी त्यांचा जन्म दिवस १जुलै हा कृषी दिन म्हणून ही साजरा केला जातो.कृषी क्षेत्रासोबत शेतकरी ,शेतमजूर अल्प उत्पन्न गटाचे शेतकरी व मजूर यांना वर्षभर काम मिळावे म्हणून'रोजगार हमी योजना'आरंभ केली.ही योजना सम्पूर्ण देशभर नंतर अंमलात आणली गेली. महाराष्ट्रची शेती आधुनिक तंत्रविज्ञानाने समृद्ध व संपन्न व्हावी असे सारखे वाटत होते.त्यानुसार केंद्र सरकारच्या धोरणानुसार २१मार्च १९६८ रोजी आहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथे कृषी विद्यापीठ स्थापन केले.ईतर विभागात ही कृषी विद्यापीठ असावे म्हणून आंदोलने झाली म्हणून स्व.नाईक यानी अकोला, परभणी व कोकणात कृषी विद्यापीठ स्थापन केले.या कृषी विद्यापीठाचा लाभ त्या-त्या विभागातील शेतकऱ्यांना झाला व शेतीची समृद्धता व विविधता वाढली.महाराष्ट्र राज्याच्या शेती विकासासाठी त्यांनी सर्वंकष प्रयत्न केले. विद्यापीठा ना त्यांनी कमी पावसाच्या भागात कमी पाण्यावर पीक कशी घेता येतील या बाबत संशोधन करा व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करा अशा सूचनाही दिल्या होत्या.

महाराष्ट्रातील जमीन कसल्या जावी या साठी त्यांनी महाराष्ट्र राज्यातील भूमिहीनांना जमिनी दिल्या.त्यासाठी त्यांनी बी-बियाणे व ईतर सुविधा पुरविण्याची व्यवस्था केली. त्यांची ही योजना नंतर च्या मुख्यमंत्र्यानी ही अमलात आणली. महाराष्ट्र राज्याची रोजगार हमी योजना ज्या प्रमाणे देशात आदर्श ठरली, त्याच प्रमाणे स्व,वसंतराव नाईक यांची कापूस एकाधिकार योजना ही वैशिष्ट्यपूर्ण ठरली. कृषी क्षेत्रात व सिंचन सोयी बाबत महाराष्ट्र ने जी उंची गाठली ती स्व. वसंतराव नाईक यांच्या मुळेच.अशा कृषी क्रांतीच्या जनकाच्या स्मृतींना कोटी!,कोटी!!प्रणाम.

**- धोंडीरामसिंह. ध. राजपूत,**
वैजापूर, संभाजीनगर.
मो.९४२१३१२२४४

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : बळीराजाच्या स्वाभिमानाला नवे बळ !

महाराष्ट्र ही संतांची, पुरोगामी विचारांची आणि अहोरात्र कष्ट करणाऱ्या बळीराजाची भूमी आहे. राज्याची अर्थव्यवस्था, ग्रामीण विकास आणि सामाजिक जीवनाची वीण ही शेती व शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांवर उभी आहे. निसर्गाची अनिश्चितता, अवकाळी पाऊस, दुष्काळ, बाजारभावातील चढ-उतार आणि वाढता उत्पादन खर्च अशा असंख्य संकटांचा सामना करत अन्नदाता आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहतो. अशा या शेतकऱ्याला केवळ सहानुभूतीची नव्हे, तर आर्थिक स्थैर्य, विश्वास आणि शासनाच्या भक्कम पाठबळाची आवश्यकता असते.

याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे. ही योजना केवळ कर्जमाफीची घोषणा नसून, शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाला बळ देणारे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती देणारे आणि शेती क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करणारे एक ऐतिहासिक पाऊल आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी १ जुलै हा दिवस 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. आधुनिक शेती, सिंचन, पीकपद्धतीतील बदल आणि कृषी विकासाच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांमुळे त्यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबनाच्या दिशेने नेले. 'शेतकरी समृद्ध झाला तरच राज्य समृद्ध होईल,' हा त्यांचा दूरदर्शी विचार आजही तितकाच प्रेरणादायी आहे.

स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच विचारांचा वारसा पुढे नेत महाराष्ट्र शासनाने जून २०२६ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाची माफी जाहीर करण्यात आली आहे. त्याचबरोबर, प्रतिकूल परिस्थितीतही प्रामाणिकपणे कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शिस्तीचा आणि प्रामाणिकपणाचा सन्मान करत त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. त्यामुळे ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित न राहता, आर्थिक शिस्तीलाही प्रोत्साहन देणारी ठरते.

राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेअंतर्गत ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

याशिवाय, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या आणि ज्यांची खाती बँकांकडे अनुत्पादित मालमत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकृत झाली आहेत, अशा शेतकऱ्यांसाठीही शासनाने दिलासादायक भूमिका घेतली आहे. बँकांसोबत 'एकवेळ समझोता' करण्याच्या माध्यमातून या शेतकऱ्यांना नव्याने आर्थिक प्रवाहात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या योजनेत करण्यात आला आहे. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी मिळण्याचा मार्ग खुला होणार आहे.




कोणतीही योजना केवळ घोषणांपुरती मर्यादित न राहता तिचा लाभ शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पारदर्शक, वेगवान आणि प्रभावीपणे पोहोचला पाहिजे, या भूमिकेतून शासनाने अंमलबजावणीची मजबूत यंत्रणा उभारली आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी थेट मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हानिहाय आवश्यक निधीची तातडीने उपलब्धता करून देण्यात आली असून, महाआयटीच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया डिजिटल, पारदर्शक आणि वेळबद्ध करण्यात आली आहे. शासनाच्या कार्यपद्धतीतील ही गतिमानता आणि उत्तरदायित्व या योजनेच्या यशाला अधिक बळकटी देणारे ठरणार आहे.

ही कर्जमुक्ती योजना म्हणजे केवळ आर्थिक मदतीचा कार्यक्रम नाही; तर बळीराजाच्या आत्मविश्वासाला नवसंजीवनी देणारा, त्याच्या स्वाभिमानाचा सन्मान करणारा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नव्या उमेदीने पुढे नेणारा परिवर्तनाचा संकल्प आहे. कृषी दिनाच्या पावन निमित्ताने शेतकऱ्यांच्या हितासाठी उचललेले हे ऐतिहासिक पाऊल महत्वाचे ठरणार आहे. या योजनेच्या बळावर महाराष्ट्रातील बळीराजा नव्या आत्मविश्वासाने उभारी घेईल, शेती अधिक सक्षम बनेल आणि ग्रामीण समृद्धीचा नवा अध्याय लिहिला जाईल.

**- वर्षा फडके - आंधळे**
उपसंचालक (वृत्त)
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमुक्ती योजना; जाणून घ्या कर्जमुक्तीची प्रक्रिया

शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून कायमची मुक्तता मिळविण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली आहे. राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

**अनेक टप्प्यांवर कामकाज**

ही कर्जमुक्तीची प्रक्रिया राबविण्यासाठी अनेक टप्प्यांवर कामकाज होत आहे. विशेष म्हणजे ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन व गतिमान पद्धतीने करण्यात येत आहे. कर्ज वा अन्य प्रकारचे आर्थिक व्यवहार ज्या बँकांद्वारे होत असतात, त्या बँकांमधून ही प्रक्रिया राबविली जात आहे. त्यासोबतच सहकाराचे ग्रामिण भागापर्यंत जाळे असलेल्या आपल्या राज्यात सहकार विभागांतर्गत येणाऱ्या विविध कार्यकारी सोसायट्या, कृषी पतसंस्था, सहकारी बँका इ. मार्फतही ही प्रक्रिया राबविली जात आहे.

**समन्वय यंत्रणा**

त्यासाठी सर्व टप्प्यांवर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांची माहिती अचूक स्वरूपात संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यासह प्रत्येक टप्प्यावर समन्वयाची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात आली आहे. प्रत्येक बँकेने मुख्यालयस्तरावर दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. योजना अंमलबजावणी समन्वयक, माहिती तंत्रज्ञान समन्वयक म्हणून हे दोन अधिकारी काम पाहणार आहेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय समिती (३७२) यांच्याशी समन्वय राखण्यासाठी स्वतंत्र जिल्हा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**आधार संलग्निकरण आवश्यक**

सामान्यतः कर्ज खात्यांचे आधार संलग्निकरण झालेले असते मात्र असेही काही खाती असतात ज्यांचे आधार संलग्निकरण झालेले नाही. अशा खात्यांचे वर्गीकरण करुन त्याची माहिती गाव, बँक, संस्था पातळीवर प्रसिद्ध करुन शेतकऱ्यांकडून आधार संलग्निकरण केले जात आहे. त्यानुसार दि.३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली वैयक्तिक व संयुक्त पीक कर्ज खाती यांचा समावेश होईल. आधार क्रमांक असलेल्या खात्यांची माहिती प्रथम अपलोड केली जाईल, तर नंतर आधार जोडणी झालेल्या खात्यांची माहिती पुढील टप्प्यांत स्वीकारली जाणार आहे.

**मयत कर्जदारांच्या वारसाची नोंद**

संयुक्त कर्जखात्यांसाठी सर्व कर्जदारांचे आधार क्रमांक, आधार-जोडलेली बचत खाती तसेच प्रत्येकाचा कर्जातील हिस्सा नमूद करण्यात येणार आहे. दुर्दैवाने एखाद्या शेतकऱ्याचा मृत्यू झाला असल्यास अशा मयत कर्जदारांबाबत प्रकरणांमध्ये वारसांची नोंद करून त्यानुसार लाभ वितरित करण्यात येणार आहे.

**पात्र लाभार्थी यादीची प्रसिद्धी**

माहितीची संगणकीय पडताळणी झाल्यानंतर गावनिहाय लाभार्थी यादी पोर्टलवर उपलब्ध होईल. ही यादी बँक शाखा व विकास संस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा संबंधित बँक शाखेत उपस्थित राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येईल.

**तक्रार करण्यास वाव**

शेतकऱ्यांना यादीतील माहितीबाबत हरकत असल्यास ती थेट जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पाठविली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित बँकांनी आवश्यक दुरुस्त्या करून माहिती अद्ययावत करणे बंधनकारक राहील.

**असा होईल लाभ जमा**

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर व्यापारी बँकांच्या लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम थेट जमा केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ४८ तासांच्या आत संबंधित नोंदी अद्ययावत करून पोर्टलवर माहिती नोंदविणे आवश्यक राहील. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांसाठी प्रोत्साहन अनुदान**

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे. एकवेळ समजोता योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

**संकलन - जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

***

# हजारोंचे अश्रू पुसणाऱ्या, आनंदाच्या क्षणी दुर्लक्षित स्मशान जोग्यांचा सत्कार

## अर्थ अभ्यासक डॉ. डी. एस. काटे यांची नाविन्यपूर्ण संकल्पना

छत्रपती संभाजीनगर दि.२९ (प्रतिनिधी)- अर्थ विषयक अभ्यासक आणि प्रसिद्ध उद्योजक अभियंता डॉ. डी. एस. काटे यांच्या वतीने नाविन्यपूर्ण संकल्पना राबवत शहरातील विविध स्मशान भूमीत अविरत सेवा देणाऱ्या चाळीसहुन अधिक स्मशान जोग्यांचा सत्कार पारंपारिक पद्धतीने करण्यात आला.

या वेळी डॉ. डी. एस. काटे म्हणाले की, कधी न केलेल्या या नावीन्यपूर्ण उपक्रमांची सुरुवात छत्रपती संभाजीनगर मधून पहिल्यांदाच होत आहे. काम कुठलेही असो श्रेष्ठत्व हे कामावर अवलंबून नसते तर ते मनुष्यपणावर अवलंबून असते. समाजसेवेचा वसा हाती घेतल्यास तो निस्वार्थपणे पार पडावा आणि खऱ्या अर्थाने समाजातील गोर-गरिबांची सेवा घडावी असे सांगत हा उपक्रम सामाजिक भावनेतून नागरिकांनी आपापल्या विशेष दिनी राबवावा असे त्यांनी आपली भावना व्यक्त करतांना स्पष्ट केले.

डॉ. डी.एस. काटे यांची अर्थ तज्ज्ञ म्हणून एक वेगळी ओळख असून त्यांच्या लेखणीतून साकारलेल्या विविध प्रकाशित पुस्तक, ग्रंथ हे देशाची अर्थ व्यवस्था मजबूत करण्यासाठी संजीवनी देणारी ठरली आहे. अर्थदिशा, अर्थजागर, अर्थसंपदा, अर्थनीती या पुस्तकांचे लेखन केल्याने विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. सद्ः स्थितीत सर्व क्षेत्रात सातत्याने होत असलेले बदल, त्यातून बदलत जाणारे अर्थ नियोजन आणि निर्माण होणारे विविध प्रश्न या सर्वांचे सामान्य वाचकांना सर्वांगीण आकलन व्हावे आणि त्याचा त्यांनी फायदा आकारून घेत आपले जीव समृध्द करावे असा त्यांचा प्रयत्न आहे. व्यवहार आणि पैशांचा विनियोग याविषयी योग्य समज त्यांच्या विविध पुस्तकातून आजही वाचकांना उभारी देत आहेत.

डॉ. डी. एस. काटे यांनी शहरातील स्मशान जोग्याना आपल्या आनंदात सहभागी करून घेत त्यांचा सहकुटुंब गौरव केला. आयुष्याच्या शेवटीही स्मशानभूमीत साथ देणारा स्मशान जोगी नेहमीच आनंदाच्या क्षणी दुर्लक्षित राहिला आहे. रक्ताची नाती सोडून जाणारी मानसिकता असलेल्या या समाजात स्मशान जोगी मात्र स्मशानात आलेल्या कुटुंबाचे सांत्वन करून राख होईपर्यंत हे जग सोडून गेलेल्या माणसाच्या सोबतीला असतो. इतरांच्या दुखाबरोबरच आपलेही दुख: पोटात घालून स्मशान जोगी कायम त्या स्मशानात दुखाःच्या छायेत वावरत असतो. आणि म्हणूनच एक सामाजिक दायित्व म्हणून या स्मशान जोग्यांच्या चेहऱ्यावर सुखाचे हास्य फुलवण्यासाठी डॉ. काटे यांच्या स्मशान जोग्यांचा भव्य सत्कार केला. यावेळी माजी केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ. भागवत कराड, माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, शेषराव चव्हाण, मनपा स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. दिलीप घारे, एकनाथ जाधव, सुभाष पाटील, प्रा. डॉ. शिवानंद भानुसे, कवी विष्णू सुरासे, ॲड. अजित काळे, स्मशान जोगी संघटनेचे अध्यक्ष गोविंद राजाराम गायकवाड आदींची यावेळी उपस्थिती होती.



# उन्नतीच्या सामाजिक कार्याला ज्येष्ठांची पावती



पुणे दि.३० (प्रतिनिधी)- राज्य परिवहन महामंडळाच्या बसभाडे सवलतीसाठी आवश्यक असलेल्या नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्डचा पिंपळे सौदागर परिसरातील एक हजार दोनशे ज्येष्ठ नागरिकांना येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने नुकताच मोफत लाभ मिळवून दिला. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून उन्नतीच्या या कार्याबद्दल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे आणि प्रभागाच्या नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे यांचा ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. पिंपळे सौदागर येथील स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर सोमवार दि. २९ रोजी डॉ. सुभाषचंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या मासिक मेळाव्यात या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात असोसिएशनचे रविंद्र संदानशिवे, जयपाल सिदनाळे, मनजीत भाटिया, मंगल पाटील, माधुरी मुलमुले, सुरेखा कुलकर्णी, सुभाष विधाते, सुरेखा पाटील, शत्रुघ्न गुप्ता, प्रिया नेवे, अशोक येळमकर आणि रेखा येळमकर या सदस्यांनी विविध गाणी सादर केली. या मेळाव्याचे प्रास्ताविक शकुंतला शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय विवेकानंद लिगाडे यांनी करुन दिला. सुत्रसंचलन निर्मला कासार आणि शोभा राजगुरे यांनी केले. आभार सतिश पिंगळे यांनी मानले.

# वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या, २५% बीजभांडवल कर्ज योजना, एक लाख रुपये थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना,या कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्री. एस. आर. बडगुजर यांनी केले आहे. या योजनांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र लाभार्थ्यांनी https://www.vnvjntdc.org/ या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आले आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आणि त्यांच्या अधिपत्याखालील उपकंपन्या, ज्यामध्ये राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ, श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ, ब्रम्हलिन आचार्य दिव्यानंद पुरीजी महाराज आर्थिक विकास महामंडळ, विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ आणि श्री. शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ यांचा समावेश आहे, त्यांच्यामार्फत विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने २५% बीज भांडवल कर्ज योजना, १.०० लाख रुपयांपर्यंतची थेट कर्ज योजना, तसेच वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजनांचा समावेश आहे.

**योजनांचे स्वरूप -** २५टक्के बीज भांडवल कर्ज या योजनेत बँकेचा सहभाग ७५टक्के तर महामंडळाचा सहभाग २५टक्के आहे. यावर ४टक्के व्याजदर असून परतफेडीचा कालावधी ५ वर्षे आहे. थेट कर्ज योजना (१ लाख) या योजनेअंतर्गत महामंडळामार्फत पूर्ण कर्ज दिले जाते. लाभार्थीने ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये (रु. २०८५ प्रति हप्ता) कर्जाची परतफेड केल्यास, त्यांना कोणतेही व्याज भरावे लागणार नाही. मात्र, हप्ते थकीत राहिल्यास ४टक्के दराने व्याज आकारले जाईल.

व्याज परतावा योजना: या योजनेत कर्ज बँकेचे असून, लाभार्थ्यांनी वेळेवर हप्ते भरल्यास १२% पर्यंतचे व्याज महामंडळाकडून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते. इच्छुक लाभार्थ्यांनी अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तिसरा मजला, न्यू शिवाजी हायस्कूल जवळ, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर ४३१००१ येथे संपर्क साधावा. तसेच, अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२४०-२९९१८५३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा व्यवस्थापक श्री. एस. आर. बडगुजर यांनी कळविले आहे.

# मुख्य अभियंता मृद व जलसंधारण यांचे कार्यालय गुरुवारपासून कार्यान्वित

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील मुख्य अभियंता मृद व जलसंधारण हे कार्यालय गुरुवार दि.२ जुलै पासून कार्यान्वित होणार आहे.मुख्य अभियंता म्हणून हरिभाऊ गिते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात मृद व जल संधारण विभागाच्या दि.२७ मे च्या शासन निर्णयानुसार मुख्य अभियंता मृद व जल संधारण छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागातील ८ तसेच नाशिक प्रादेशिक विभागातील ५ असे एकूण १३ जिल्ह्यांचे असणार आहे.या कार्यालयाचे पहिले मुख्य अभियंता म्हणून हरिभाऊ गिते यांची करण्यात आली आहे.आयुक्त मृद व जलसंधारण यांनी त्यांचेकडे हा पदभार देण्यात आला आहे. वाल्मी परिसर, कांचन वाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे हे कार्यालय दि.२ जुलै पासून कार्यान्वित होईल. या कार्यालयाचे उद्घाटन दि.२ जुलै रोजी दुपारी १२ वा. होणार आहे,असे प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, दक्षता व गुण नियंत्रण पथक (मृद व जल संधारण) छत्रपती संभाजीनगर यांनी कळविले आहे.


सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)


# विद्यार्थी प्रवेश प्रक्रियासाठी जात वैधता प्रमाणपत्र वितरणासाठी विशेष मोहीमेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. ही मोहीम दिनांक २६ जून २०२६ ते ३ जुलै २०२६ या कालावधीत राबवली जाणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये ११ वी व १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेले आणि १२ वी नंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, पशुसंवर्धन, विधी यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी या मोहिमेचा लाभ घेऊ शकतात. यामध्ये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी https://ccvis.barti.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावा. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून, त्यासोबत आवश्यक सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात. सदर कागदपत्रे तत्काळ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात जमा करावीत.या मोहिमेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांवर समितीकडून तातडीने कार्यवाही केली जाईल. तसेच, संबंधित विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केले जाणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी या विशेष मोहिमेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन. डॉ. दीपक खरात, जिल्हा जात पडताळणी समिती,छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# मराठवाड्यातील सेवा संस्थांचा स्नेह मेळावा ११ जुलैला छत्रपती संभाजीनगर येथे

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- मराठवाडा विभागात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, ग्रामीण विकास तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सेवा संस्थांचा परस्पर परिचय व्हावा, त्यांच्या अनुभवांची देवाणघेवाण घडून यावी आणि सेवा कार्याचे सशक्त नेटवर्क निर्माण व्हावे, या उद्देशाने 'मराठवाडा सेवा संस्था स्नेह मेळावा'चे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामायण प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित हा मेळावा शनिवार, दि. ११ जुलै रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. सन २०१२ पासून महाराष्ट्रभर सामाजिक व ग्रामीण विकासाच्या विविध उपक्रमांमध्ये कार्यरत असलेल्या ग्रामायण प्रतिष्ठानने या उपक्रमाची जबाबदारी स्वीकारली आहे.

या स्नेह मेळाव्यात मराठवाड्यातील निवडक सेवा संस्थांच्या कार्याचे सादरीकरण करण्यात येणार असून, विविध सत्रांमध्ये स्वयंसेवी संस्थांसमोरील प्रश्न, आव्हाने आणि त्यावरील उपाययोजनांवर चर्चा होणार आहे. तसेच, परस्पर सहकार्याची क्षेत्रे, विविध विषयांमध्ये एकमेकांना करता येणारी मदत आणि सेवा कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी राबविता येणारे उपक्रम यावरही सखोल विचारमंथन करण्यात येणार आहे.

मराठवाड्यातील सर्व सेवा संस्थांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रत्येक संस्थेतून जास्तीत जास्त दोन प्रतिनिधींना सहभागी होता येणार असून, सहभाग पूर्णपणे निःशुल्क ठेवण्यात आला आहे. मेळाव्याचे स्थळ दुसऱ्या मजल्यावरील सभागृह, सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, ओंकार शैक्षणिक संकुल, गट क्रमांक ४४, कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या मागे, बीड बायपास रस्ता, छत्रपती संभाजीनगर येथे आहे. सहभाग इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी आयोजकांनी उपलब्ध करून दिलेला गुगल फॉर्म भरून आपली नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी शिरीष कुलकर्णी (९८२२० ४५३४६), शंतनु पुराणकर (९५५२५ ६९८४५), पंडित घुगे (९५४५११९११९), मनोज शेवाळे (९८२३० ६८२३०) आणि पद्मश्री केंडे यांच्याशी संपर्क साधावा.

# शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा थेट शिक्षकांवरच चाकू हल्ला; शिक्षकांवर रुग्णालयात उपचार सुरू

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- शाळा हे विद्यार्थ्यांवर संस्कार करणारे आणि त्यांचे भविष्य घडवणारे पवित्र ठिकाण मानले जाते. मात्र छत्रपती संभाजीनगरमधील एका शाळेत घडलेल्या घटनेने या विश्वासालाच मोठा हादरा दिला आहे. टीसी घेण्यासाठी आलेल्या एका अल्पवयीन विद्यार्थ्याने आपल्या माजी वर्गशिक्षकावर थेट चाकूने जीवघेणा हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दोन वर्षांपूर्वी फेल झाल्याचा राग मनात धरून या विद्यार्थ्याने आधी शिक्षकांसोबत तब्बल अर्धा तास वाद घातला आणि त्यानंतर संतापाच्या भरात हा रक्तरंजित हल्ला केला, ज्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

टीसी घेण्यासाठी आलेला एक अल्पवयीन विद्यार्थी थेट मुख्याध्यापिकांच्या दालनात गेला, जिथे त्याची भेट त्याचे माजी वर्गशिक्षक विशाल धूशिंग यांच्याशी झाली. सुरुवातीला त्यांच्यात सामान्य चर्चा झाली, परंतु अल्पावधीतच या चर्चेचे रूपांतर तीव्र वादात झाले. मुख्याध्यापिका आणि शिक्षक या विद्यार्थ्याची समजूत काढण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते, मात्र सुमारे अर्धा तास चाललेल्या या वादानंतर परिस्थिती अचानक नियंत्रणाबाहेर गेली. विद्यार्थ्याच्या मनात गेल्या दोन वर्षांपासून साचलेला अपयशाचा संताप अखेर उफाळून आल्याने हा सगळा प्रकार घडला.

२०२३ मध्ये नववीत शिकत असताना तो विद्यार्थी परीक्षेत नापास झाला होता आणि त्यावेळी त्याचे तत्कालीन वर्गशिक्षक विशाल धूशिंग यांच्यासोबत त्याचे खटकेही उडाले होते. याच अपयशाचा राग मनात धरून, आज टीसी घेण्यासाठी येताना त्याने ऑनलाईन मागवलेला चाकू सोबत आणल्याचे तपासात समोर आले आहे. मुख्याध्यापकांच्या दालनातील वाद संपून शिक्षक धूशिंग बाहेर पडत असतानाच, या विद्यार्थ्याने अचानक चाकू काढून त्यांच्यावर हल्ला चढवला.

यावेळी शिक्षकाला वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या एका व्यक्तीलाही त्याने चाकूचा धाक दाखवून मागे हटवले. तर या अत्यंत भयानक गोंधळात मुख्याध्यापिकांनी प्रसंगावधान राखल्यामुळे त्यांचा बचाव झाला.

या जीवघेण्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या शिक्षकाला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. या धक्कादायक घटनेनंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत हल्ला करणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्याला ताब्यात घेतले आहे. तसेच, गुन्ह्यात वापरलेला चाकूही जप्त करण्यात आला असून या संपूर्ण प्रकरणाचा पोलिसांकडून अधिक सखोल तपास केला जात आहे.

# जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ; महाकर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार असून, योजनेची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत थकबाकीदार पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (ओटीएस) योजना, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

योजनेची संपूर्ण प्रक्रिया आधार क्रमांकावर आधारित व ऑनलाइन ठेवण्यात आली असून, महाआयटीच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांची संगणकीय पडताळणी केली जात आहे. अंतिम याद्या ग्रामपंचायत, बँका, आपले सरकार सेवा केंद्र तसेच गाव चावडीवर प्रसिद्ध करण्यात येणार असून, लाभार्थ्यांना मोबाईल संदेशाद्वारेही माहिती दिली जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांनी लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. ओटीएस योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम स्वतःचा हिस्सा जमा केल्यानंतरच शासनाकडून कर्जमुक्तीची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा केली जाणार आहे. तसेच तांत्रिक अडचणींचे त्वरित निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या योजनेमुळे लाखो शेतकरी पुन्हा कर्जपात्र होऊन नवीन पीक कर्ज मिळविण्याचा मार्ग मोकळा होणार असून, राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळण्याबरोबरच बळीराजाला आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकशास्त्र व सकारात्मक प्रसाराची गरज-महापौर समीर राजूरकर



छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- शहराचा विकास केवळ चांगले रस्ते, उंच इमारती किंवा भौतिक सुविधांमुळे होत नाही, तर शहरातील नागरिकांचे नागरिकशास्त्र, संस्कृती, सामाजिक जाणीव आणि शहराविषयीची आपुलकीही तितकीच महत्त्वाची असते. छत्रपती संभाजीनगरला विकसित आणि जागतिक स्तरावर सकारात्मक ओळख मिळवून देण्यासाठी प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमांवरील कंटेंट क्रिएटर्स यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महापौर समीर राजूरकर यांनी केले.

महापौर समीर राजूरकर यांच्या संकल्पनेतून 'कॉफी विथ मेयर' या संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन आज स्मार्ट सिटी कार्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमात शहरातील सुमारे १०० सोशल मीडिया कंटेंट क्रिएटर्स, ट्रॅव्हल ब्लॉगर्स, कॉमेडी क्रिएटर्स आणि विविध डिजिटल माध्यमांशी संबंधित प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी महापौर राजूरकर म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर शहराचा आत्मा हा त्याच्या समृद्ध पर्यटन वारशात आहे. शहरातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पर्यटन स्थळांची सकारात्मक माहिती देश-विदेशापर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे समाजमाध्यमे आहेत. त्यामुळे शहराची चांगली, विश्वासार्ह आणि सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत.

कार्यक्रमादरम्यान शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजना, नागरिकांचा सहभाग, स्वच्छता, वाहतूक शिस्त, पर्यटन विकास, सांस्कृतिक जतन आणि डिजिटल माध्यमांची भूमिका यासह विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. सहभागी कंटेंट क्रिएटर्स व ब्लॉगर्स यांनी मांडलेल्या सूचना आणि अपेक्षा महापौरांनी लक्षपूर्वक ऐकून घेतल्या. शहराला अधिक सुंदर, विकसित आणि जगासमोर सकारात्मक प्रतिमेसह उभे करण्यासाठी नागरिक, प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांवरील कंटेंट क्रिएटर्स यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापौर समीर राजूरकर यांनी यावेळी केले.

# अति.वाळूज औद्योगिक वसाहत भूसंपादन; जिल्हाधिकाऱ्यांकडे शेतकऱ्यांची बैठक



छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- नियोजित अति.वाळूज औद्योगिक वसाहत क्षेत्र भूसंपादनाबाबत आज आरापूर, सुलतानाबाद, गवळी शिवरा ता. गंगापुर येथील शेतकऱ्यांची आज जिल्हाधिकाऱ्यांकडे बैठक झाली. त्यात त्यांनी आपले गाऱ्हाणे मांडले. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले.याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठवून शेतकऱ्यांच्या मागण्या कळविण्यात येतील, असे त्यांनी आश्वस्त केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात नियोजित औद्योगिक वसाहतीकरीता भूसंपादन करावयाच्या जमिन दरांच्या वाटाघाटीबाबत बैठक पार पडली. बैठकीस उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) एकनाथ बंगाळे, प्रादेशीक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक वसाहत अमित भामरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी तसेच अन्य अधिकारी व ग्रामस्थ शेतकरी उपस्थित होते.

नियोजित अति. वाळूज औद्योगिक वसाहतीसाठी आरापुर येथील १७१.८० हेक्टर, सुलतानाबाद येथील १७७.६२ हेक्टर तर गवळी शिवरा येथील ४१२.६१ हेक्टर क्षेत्र असे एकूण ७६२.०३ हेक्टर क्षेत्र संपादीत करावे लागणार आहे. या क्षेत्रावरील शेतकऱ्यांना आज बैठकीसाठी बोलावण्यात आले होते.

बैठकीत शेतकऱ्यांचा वतीने मांडण्यात आलेले प्रमुख मुद्दे याप्रमाणे होते. भूसंपादन करावयाच्या जमिनीचे मालक हे सर्वच शेतकरी आहेत. ते सध्या शेतीच करीत आहेत. त्यांची उत्पन्नाची जमिन जात असल्याने त्यांना जमिनीच्या बदल्यात जमिन आणि तिही लगतच्या क्षेत्रातच घेता यावी, इतका मोबदला मिळावा. बहुतेक शेतकरी हे शेतातच घर करुन राहतात. त्यांना घराचा स्वतंत्र मोबदला व निवासासाठी स्वतंत्र भूखंड मिळावा. येणाऱ्या उद्योगांमध्ये तसेच त्यासाठी होणाऱ्या विकास कामांमध्ये स्थानिकांना समाविष्ट करण्यात यावे. शेतकऱ्यांच्या मान्यतेशिवाय दर निर्धारण करण्यात येऊ नये असे मुद्दे शेतकऱ्यांनी मांडले.

जिल्हाधिकारी गौडा यांनी शेतकऱ्यांना आधारभूत कमाल दराची माहिती दिली. निवासासाठी स्वतंत्र भूखंड दिले जातील. जमिन मालकांना अधिकाधिक वाजवी दर मिळावा यासाठीच या वाटाघाटी होत आहेत. वाढीव मागणी बद्दल शासनास कळविण्यात येईल व त्यामान्यतेनंतरच पुढील वाटाघाटी होतील,असेही त्यांनी सांगितले. प्रादे. अधिकारी भामरे यांनी एमआयडीसी स्थापनेनंतर होणाऱ्या लाभांची माहिती दिली.

# आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार

छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील दीर्घकाळ प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा आज मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी सहाय्यक आयुक्त नईम अहमद अन्सारी, उप अग्निशमन केंद्र अधिकारी अशोक खांडेकर तसेच अनुरेखक मजहर अली यांचा शाल, प्रमाणपत्र आणि गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्यासह विविध प्रवर्गातील एकूण २५ अधिकारी व कर्मचारी आज सेवानिवृत्त झाले.

यावेळी मुख्य लेखापरीक्षक शि. बा. नाईकवाडे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या दीर्घ सेवेला गौरवपूर्वक सलाम करत त्यांना निरोगी, आनंदी व यशस्वी पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



# अजिंठा लेणी येथे 'ऐतिहासिक संबंध, भारत आणि प्राचीन विश्व' प्रदर्शन

फर्दापूर दि.३० (प्रतिनिधी)- मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाने सुरू केलेल्या 'म्युझियम ऑन व्हील्स' या उपक्रमांतर्गत शुक्रवारी अजिंठा लेणीच्या पायथ्याशी 'ऐतिहासिक संबंध: भारत आणि प्राचीन विश्व' या आगळ्या वेगळ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या फिरत्या संग्रहालयाला देशी-विदेशी पर्यटकांसह स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक इतिहासाची माहिती घरबसल्या उपलब्ध करून दिल्याबद्दल पर्यटकांनी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण आणि मुंबई वस्तुसंग्रहालयाचे आभार मानले.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांना केवळ माहितीच मिळाली नाही, तर इजिप्शियन लिपीची ओळख आणि सन १४३० मधील जर्मनीचे प्रसिद्ध इंटाग्लिओ प्रिंटिंग तंत्र स्वतः करून पाहण्याची दुर्मिळ संधी मिळाली.

या वेळी अजिंठा लेणीचे संरक्षण सहायक मनोज पवार, फर्दापूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सुधीर बी. मोठे, प्रबंधक महादेव हिरवे, एम.टी.डी.सी.चे प्रबंधक राज पाटील आणि पोलिस कर्मचारी भारत कोळी आदींनी प्रदर्शनाला भेट देऊन कौतुक केले. पर्यटन आणि सांस्कृतिक जनजागृतीसाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरत असून, सर्व स्तरांतून या प्रवासाचे स्वागत होत आहे.

वातानुकूलित बसमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची गॅलरी हा संपूर्ण उपक्रम एका अद्ययावत वातानुकूलित बसमध्ये साकारण्यात आला आहे. बस चालत असताना आतील वस्तू किंवा माहिती फलक पडू नयेत म्हणून विशेष तांत्रिक रचना करण्यात आली आहे. या संग्रहालयात जगातील चार महान व प्राचीन संस्कृतींचे दर्शन घडवले गेले आहे. यामध्ये भारताची वैभवशाली हडप्पा व मोहेंजोदडो संस्कृती, सुमारे ९ हजार वर्षे जुनी मेसोपोटेमियन संस्कृती, ५ ते साडेपाच हजार वर्षे जुनी रहस्यमय इजिप्शियन संस्कृती आणि चिनी संस्कृती या चार प्रमुख संस्कृतींचा समावेश आहे.

(पान १ वरुन)

## मी जे करतो ते फुल प्रूफ करतो!;...

त्यांची निवड होईल आणि ते फक्त मुंबईच नाही तर महाराष्ट्रात उपसभापती म्हणून न्याय देण्यासाठी काम करतील. ते आल्यामुळे शिवसेनेची देखील ताकद वाढली आहे. कामगार क्षेत्र असेल, मुंबई असेल पुणे असेल, त्यांनी जिथे काम केले आहे तिथे ताकद वाढेल.

दरम्यान सचिन अहिर बोलताना म्हणाले, मी आदरणीय एकनाथ शिंदे यांचे आभार मानतो. जेव्हा कोळशातून हिऱ्याची चमक दिसते आणि तो हिरा जवळ करण्याची संधी येते त्यातूनच विश्व घडवण्याचे काम करत असतो त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी बहुमान देऊन मला उपसभापती पदावर नेऊन बसवले आहे. बाळासाहेब ठाकरे असतील, दिघे साहेब असतील यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनी काम सुरू ठेवले आहे.

पुढे बोलताना सचिन अहिर म्हणाले, एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनात काम करण्याची संधी मला मिळाली आहे. आतापर्यंत जे उपसभापती होते, त्यांची गरिमा वाढवण्याचे काम मी करण्याचा प्रयत्न करेल. तसेच शिवसेना पक्ष म्हणून कसा वाढवता येईल, यावर मी काम करेल. मला या गोष्टीची जाणीव आहे की अनेक राजकीय प्रश्न आहेत, पण त्यावर वेगळ्या व्यसपीठावार बोलता येईल. टीका होईल, ते ठीक आहे. त्यावर वेगळ्या ठिकाणी मी बोलेल. शिंदे साहेबांनी जी जबाबदारी दिली आहे, ती निभावण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न करेल, असे अहिर यांनी म्हटले आहे.

## अवैध डान्स बार रोखण्यासाठी...

हा गैरप्रकार रोखण्यासाठी पोलीस कायद्यात दुरुस्ती करण्यात येत असून, त्यानंतर डान्स बार चालविणाऱ्या सर्व आस्थापनांना डान्स बार कायद्यांतील सर्व अटी व निर्बंधांचे पालन करणे बंधनकारक राहील.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नियमांचे उलंघन करणाऱ्या आस्थापनांवर तसेच संबंधित दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. वारंवार नियमभंग करणाऱ्या किंवा गुन्हे घडणाऱ्या आस्थापनांचा परवाना रद्द करण्याची तरतूद करण्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यामध्ये अश्लील नृत्यावर प्रतिबंध घालणे व त्यामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण अधिनियम, २०१६ अंतर्गत ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एकाही ध्वनिमुद्रित संगीतावरील नृत्य परवान्यास मंजुरी देण्यात आलेली नसल्याचे सांगितले.

## केतन अग्रवाल प्रकरणात सियाच्या....

पूर्वकल्पना होती का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. सिया-चेतनची लव्हस्टोरी सुरु झाली आणि मध्येच केतनची एन्ट्री झाली. फेब्रुवारीत साखरपुडाही झाला. मात्र तिला केतनशी लग्न करायचं नव्हतं, हे सियाने साहिलला सांगितलं होतं. तसंच बालीला प्री विडिंग शूटला जाण्यासाठी घरातून बाहेर पडल्यावर सिया आणि साहिलमध्ये भांडणही झालं होतं का असा सवालही उपस्थित होऊ लागला आहे.

पुढं फूड मॉल वर सियाने केतनचा पासपोर्ट फाडून टाकला, मुंबई विमानतळावर पोहचल्यावर केतनला पासपोर्ट सापडला नाही. आता केतनशी सियाला लग्न करायचं नाही, हे साहिलला आधीचं माहिती होतं, मग केतनचा पासपोर्ट गायब झाल्यावर, तो सियाने गायब केलाय, ही शंका साहिलच्या मनात आली असेल का? जर शंका आली असेल तर ती शंका साहिलने उपस्थित का केली नसावी?, असा सवाल उपस्थित होत आहे.

## फडणवीस त्यांच्या पदावर राहणार...

तुम्ही त्यांना समोर बसवतात. त्याचे कागद मंजूर करतात, देवेंद्र फडणवीस हा घटनेशी द्रोह आहे. म्हणूनच त्याची कर्माची फळ तुम्हाला मिळताय. उद्धव ठाकरेंनी सांगितलं ऑपरेशन देवेंद्र सुरु झालंय. काही काळापासून देवेंद्र दिल्लीत जाणार, उच्च पदावर जाणार या चर्चांना त्यांच्या वागणुकीमुळेच आता पूर्णविराम मिळाला आहे. आता देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रात त्यांच्या पदावर राहतील की नाही अशा प्रकारचे रहस्यमय वातावरण मिध्यांनी निर्माण केले आहे. ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे,'' असे त्यांनी म्हटले.

संजय राऊत पुढे म्हणाले की, ''या लोकांचे राजीनामा घेतले पाहिजे, कायद्याने हे अपात्र ठरले पाहिजेत. पक्षांतर विरोधी कायद्यानुसार त्या लोकांची खासदारकी रद्द व्हायला पाहिजे असे घटना आणि कायदा सांगते. पण पक्षांतर केलेल्या गुन्हेगारांना देवेंद्र फडणवीस आपल्या चेंबरमध्ये बसवून त्यांना जनतेच्या पैशाने चहा बिस्कीट देऊन त्यांच्या कागदावर सह्या करत असतील तर देवेंद्र फडणवीस हे घटनाद्रोही आणि रामद्रोही आहेत. ओम निंबाळकरांपासून सगळे लोक हे राज्याचे आणि जनतेचे गुन्हेगार आहेत. अशा गुन्हेगारांना तुम्ही पद देणार असाल, निधी देणारा असाल तर मग आधी का दिला नाही? जनता तीच होती आणि खासदार पण तेच होते. मग आधी का दिला नाही? हे घटनेचे राज्य नाही. याची किंमत या सर्वांना चुकवावी लागेल,'' असा इशारा देखील त्यांनी दिलाय.

## जळगावमध्ये महिलेवर सामूहिक...

एका तरुणाच्या सोबत आढळून आली.यावेळी काही तरुणांनी तिला आणि तिच्या सोबतच्या तरुणाला धमक्या देत महिलेवर मित्रासमोरच दोन आरोपींनी जबरदस्तीने सामूहिक बलात्कार केल्याची तक्रार पीडितेचे पोलिसात केली आहे.

सदर प्रकरणातील दोघा आरोपींनी धाक दाखवून अत्याचार केला होता. तर काही तरुणांनी या घटनेचे व्हिडीओ चित्रण केले होते. त्यापैकी एका संशयिताने हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल केल्यानंतर प्रकरण पुन्हा चर्चेत आले. घटनेची माहिती मिळताच फत्तेपूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला वेग दिला.

## शेतकरी कर्जमाफी म्हणजे निव्वळ...

काल आम्ही सदनात हा विषय मांडून सर्वांच्या नजरेत आणून दिला आहे. ही कर्जमाफी १०-१२ हजार कोटींच्या पलीकडे जाणार नाही, हे लवकरच स्पष्ट होईल.'' ''शेतकऱ्यांचा खरीप हंगाम सुरू झाला आहे. तो कर्जाची वाट बघतोय, पण सरकार केवळ तारीख पे तारीख देऊन टाईमपास करत आहे. यावरून या सरकारची दुटप्पी भूमिका दिसून येते,'' असा हल्लाबोल त्यांनी केला. याआधी काल (२९ जून) विधानसभेत पुरवणी मागण्यांवर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी कर्जमाफीच्या अटी आणि शर्तीवरून सरकारचे वाभाडे काढले. सत्ताधाऱ्यांच्या दुटप्पीपणावर बोट ठेवत ते म्हणाले, ''सत्ताधारी सदस्य आधी कर्जमाफीचे कौतुक करतात आणि नंतर अटी जाचक असल्याचे सांगतात. हे म्हणजे जेवणाची तारीफ करायची आणि वरून मीठ-तिखट कमी होते असे सांगण्यासारखे आहे. अटींचे जाळे असेल तर तारीफ कशाला करताय?

# शहरपथ विक्रेता समिती सदस्य निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे मनपाचे आवाहन



छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- महानगरपालिकेच्या वतीने महाराष्ट्र पथ विक्रेता उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन महाराष्ट्र नियम २०१६ अंतर्गत दि.२५ जुलै रोजी निवडणूक पार पडणार आहे.

या अनुषंगाने आज उप आयुक्त ०२ तथा निवडणूक निर्णय अधिकारी अपर्णा थेटे यांच्या अध्यक्षतेखाली पथ विक्रेता संघटनेच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्यात आली.

यावेळी एनयूएलएमचे प्रकल्प व्यवस्थापक सुरेंद्र पाटील, भरत मोरे ,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉकर्स युनियनचे राजू हिवराळे, जन सहारा हॉकर्स संघटनाचे सलीमउद्दीन सिद्दिकी ,संघर्ष कामगार संघटना अहमद जलिस, भारतीय बहुजन कामगार संघ प्रशांत गायकवाड, हॉकर्स जॉइन ॲक्शन कमिटी मुंजाभाऊ भाले आदींची उपस्थिती होती.

या बैठकीत निवडणूक प्रक्रिया कशी पार पडणार आहे ,याची महापालिकेच्या वतीने कशी तयारी करण्यात आली आहे याची माहिती देण्यात आली. ी निवडणूक प्रक्रिया निःपक्ष पणे व सुरळीत पार पाडण्यासाठी महापालिकेच्या वतीने सुष्म नियोजन करण्यात आले आहे. शहरातील स्थानिक वृत्त वाहिनी ,एफ एम रेडिओ ,यावरती जिंगल स्वरूपात जनजागृती ,वर्तमान पत्रातून जनजागृती, रिक्षा द्वारे प्रत्येक प्रभात जनजागृती, तसेच सोशल मिडियावरती पदाधिकारी व संघटनेचे प्रतिनिधी यांचे अपिलीय बाईट या द्वारे माहिती देण्यात येणार आहे.

ही निवडणूक मनपा शाळेच्या ०६ मतदान केंद्र व २० बूथ वरती पार पडणार आहे. यात मनपाच्या भडकल गेट , किराडपुरा, मुकुंदवाडी, प्रियदर्शनी शाळा व सिल्क मिल कॉलनी येथील मनपा शाळा या सहा केंद्रांचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी १४०९८ मतदार असून एकूण ८ पदांसाठी निवडणूक पार पडणार आहे. सदर निवडणूक ही बॅलेट पेपर वरती होणार असून प्रत्येक मतदाराकडे आधार कार्ड व सर्वेक्षण केलेला युनिक आयडी नंबर आवश्यक असणार आहे. यानंतरच ते मतदान करू शकतात. उपस्थित संघटना प्रतिनिधींनी ही निवडणूक यशस्वी करण्याकरिता वार्डातील नगरसेवक यांची मदत घेण्याची सूचना केली. निवडणुकी मध्ये उमेदवारासाठी २००० रु. अनामत रक्कम भरावी लागणार आहे. अशी माहिती सुरेंद्र पाटील यांनी या वेळी दिली. सदर निवडणूक सुरळीत पार पडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी महापालिकेच्या वतीने करण्यात आले.